मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा ही मागणी मी मुख्यमंत्री असताना झाली होती. यासाठी रंगनाथ पाठारे यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्यात आली होती. या समितीने दिलेल्या अहवालानुसार केंद्राकडे पाठपुरावा सुरू केला होता. केंद्राने राज्याचा प्रस्ताव मान्यही केला होता. पण अन्य भाषांचा प्रस्ताव आल्याने तो प्रलंबित राहिला. पुढे १० वर्षे केंद्रातील मोदी सरकारने यावर निर्णय घेण्याचे टाळले होते.
-पृथ्वीराज चव्हाण, माजी मुख्यमंत्री

मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा, ही महाराष्ट्रातील प्रत्येक मराठी मनाची अनेक वर्षांपासूनची इच्छा पूर्ण करत मोदी सरकारने महाराष्ट्राला मोठी भेट दिली आहे. साहित्यिक इतिहासासह आधुनिक रुपातही आपले भाषिक सौंदर्य जपणाऱ्या आपल्या मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देऊन मोदी यांनी मराठी माणसाचा अभिमान उंचावला आहे.
- विनोद तावडे, माजी मराठी भाषा मंत्री, भाजप सरचिटणीस

महाराष्ट्राला लढल्याशिवाय काही मिळत नाही, उशिरा का होईना मराठी भाषेला न्याय मिळाला. रंगनाथ पठारे समितीने मराठी ही कशी अभिजात भाषा आहे हे पटवून देणारा अहवाल दिल्यानंतरही केंद्र सरकारकडून तिला अभिजात भाषेचा दर्जा दिला जात नव्हता. अखेर अभिजात भाषेचे अडीचशे वर्षांहून अधिक जुने निकष पूर्ण करणाऱ्या मराठी भाषेला निवडणुकीच्या तोंडावर का होईना न्याय मिळाला याचे समाधान आहे.
- सुभाष देसाई, माजी मराठी भाषामंत्री

अभिजात दर्जा मिळाल्यानंतर भाषेसाठी योगदान देण्याचीही अपेक्षा

‘मराठीत लेखन आता अभिमानास्पद’

लोकसत्ता प्रतिनिधी

पुणे : ‘मराठीला अभिजात दर्जा मिळाल्याने आता मराठीमध्ये लेखन करणे अभिमानास्पद मानले जाईल. मुळातच अभिजात असलेल्या मराठीला अभिजात भाषेचा दर्जा उशिराने का होईना मिळाला याचा आनंद जरूर आहे. पण, आता ‘मी मराठीसाठी काय करतो किंवा करते’ याचा विचार प्रत्येक व्यक्तीने करायला हवा. मराठी प्रमाणभाषा अधिक विकसित व्हायला हवी,’ अशी अपेक्षा ज्येष्ठ साहित्यिक आणि भाषा अभ्यासकांनी व्यक्त केली.

‘मराठीला अभिजात दर्जा मिळाल्यामुळे भाषेचा विकास होण्यास मदत होईल. त्यासाठी केंद्रीय विद्यापीठांमध्ये मराठीच्या अध्ययन आणि संशोधनासाठी ‘अत्युच्च संशोधन संस्था’ (सेंटर ऑफ एक्सलन्स) स्थापन करण्याबरोबरच त्यासाठी आर्थिक तरतूद करायला हवी,’ अशी अपेक्षा भाषा सल्लागार समितीचे अध्यक्ष लक्ष्मीकांत देशमुख यांनी व्यक्त केली. ते म्हणाले, ‘मराठीमध्ये लेखन करणे आता आणखी अभिमानास्पद होईल. मराठी बोली भाषा ही ज्ञानभाषा करण्यासाठी प्रयत्न करायला हवेत. राज्य शासनाच्या भाषा धोरणांमध्ये त्या स्वरूपाची शिफारस करण्यात आली आहे. विज्ञान-तंत्रज्ञान मराठीमध्ये आले आणि मराठी ही रोजगाराची भाषा होऊ शकली, तर तरुणाई आपोआप मराठीकडे वळेल.’

मराठीला अभिजात भाषेचा दर्जा देण्याचा निर्णय केंद्रीय मंत्रिमंडळाने गुरुवारी घेतला. याबाबतची माहिती केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी पत्रकार परिषदेत दिली.

केंद्राकडून मोठ्या निधीची अपेक्षा

‘मराठीला अभिजात दर्जा मिळाल्यामुळे मराठीसाठी केंद्र सरकारकडून मोठा निधी प्राप्त होईल. अनेक योजना आखता येतील. पण, हे सर्व योग्य रीतीने व्हावे, यासाठी नागरी समाजाचा दबाव सरकारवर हवा,’ अशी अपेक्षा विश्वकोश निर्मिती मंडळाचे माजी अध्यक्ष डॉ. राजा दीक्षित यांनी व्यक्त केली. ‘अत्यंत महत्त्वाची गोष्ट म्हणजे ‘मी मराठीसाठी काय करतो किंवा करते’ याचा विचार प्रत्येक व्यक्तीने करायला हवा. मराठी प्रमाणभाषा अधिक विकसित व्हायला हवी. मराठीच्या बोली टिकवणे हे एक मोठे आव्हान आहे. तिकडेही लक्ष द्यायला हवे. मुलांना जगाच्या स्पर्धेत टिकण्यासाठी इंग्रजी माध्यमात शिकवले जाते. पण, घरात मातृभाषा टिकवण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करावे लागतील,’ याकडे दीक्षित यांनी लक्ष वेधले.

> मराठी भाषेस अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्याची ऐतिहासिक घटना घडली. हा क्षण प्रत्येक मराठी माणसासाठी अभिमानाचा क्षण असून आपल्या भाषेची समृद्धी आणि वारसा जपण्यास हे महत्त्वाचे पाऊल ठरणार आहे. मराठी भाषा मंत्री या नात्याने सातत्यपूर्णपणे पाठपुरावा केल्याचे फलित मिळाले.
> -दीपक केसरकर, मराठी भाषा मंत्री

ऐतिहासिक निर्णय - अजित पवार

मुंबई / नवी दिल्ली : मराठीला अभिजात भाषेचा दर्जा देण्याचा निर्णय ऐतिहासिक असल्याची प्रतिक्रिया उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिली आहे. अनेक दशकांपासूनची ही मागणी मान्य झाल्याबद्दल त्यांनी आनंद व्यक्त केला. त्याबरोबरच राष्ट्रवादी (शरद पवार), मनसे आदी पक्षांनीही याचे स्वागत केले असताना काँग्रेसने हा निर्णय घेण्यास उशीर झाल्याचे म्हटले आहे. राष्ट्रवादी (शरद पवार) पक्षाचे प्रवक्ते अनिश गावंडे यांनी केंद्र सरकारने घेतलेल्या निर्णयाचे स्वागत केले. मात्र त्याच वेळी शिंदे सरकारला मराठीचा प्रचार आणि प्रसार करण्यात अपयश आल्याची टीका केली. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी २०२४च्या लोकसभा निवडणुकीत पंतप्रधान मोदी यांना पाठिंबा देताना अभिजात भाषेचा दर्जा देण्याची जाहीर मागणी केल्याची आठवण पक्षाचे एकमेव आमदार प्रमोद पाटील यांनी करून दिली.

‘मराठीला अभिजात दर्जा मिळाल्याचा आनंद जरूर आहे. पण, भाषेला गतवैभव प्राप्त करून देण्याची जबाबदारी आपल्या प्रत्येकाला पेलावी लागेल,’ अशी अपेक्षा अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या माजी अध्यक्षा डॉ. अरुणा ढेरे यांनी व्यक्त केली. ‘मराठीची आपण अक्षम्य हेळसांड केली आहे. ती दूर करून सुंदर आणि समृद्ध भाषेचा वापर करताना भाषेच्या अभिवृद्धीचा गोवर्धन उचलून धरणे ही सर्वांची जबाबदारी आहे,’ असे त्यांनी नमूद केले. ‘मराठी या प्रतिष्ठेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्याने प्रोत्साहन मिळेल. अभिजात भाषेसाठी अनुदान मिळण्याची तरतूद असल्याने भाषेचा विकास होईल,’ असे मत राज्य साहित्य संस्कृती मंडळाचे अध्यक्ष डॉ. सदानंद मोरे यांनी व्यक्त केले. ‘उशिराने का होईना मराठीला अभिजात दर्जा मिळाल्याचा आनंद वाटतो. या निर्णयामुळे मराठी भाषकांचा आत्मविश्वास वाढण्यास मदत झाली तरी पुष्कळ गोष्टी साध्य होऊ शकतील,’ असे मत अभिजात मराठी भाषा समितीचे अध्यक्ष प्रा. रंगनाथ पठारे यांनी व्यक्त केले.

‘अभिजात मराठी’चा प्रवास...

- २००४ : अभिजात भाषा दर्जा योजना सुरू
- २००४ : तमिळला दर्जा
- २००५ : संस्कृतला दर्जा
- २००८ : तेलुगू, कन्नडला दर्जा
- २०१२ : राज्य सरकारकडून मराठी अभिजात भाषा समितीची स्थापना
- २०१३ : मल्याळमला दर्जा
- २०१३ : मराठीला अभिजात भाषेच्या दर्जासाठी महाराष्ट्राकडून प्रस्ताव
- २०१३ : केंद्र सरकारच्या भाषा तज्ज्ञ समितीची स्थापना.
- २०१४ : उडियाला दर्जा
- २०१६ : महाराष्ट्र साहित्य परिषदेतर्फे लोकचळवळ सुरू
- २०१६ : ‘मसाप’च्या शाहूपुरी शाखेतर्फे पंतप्रधान कार्यालयाला एक लाख पत्रे
- सन २०१६ : भिलार या पाचगणीत ‘पुस्तकांच्या गावी’ तत्कालीन मुख्यमंत्री फडणवीस यांचे व्यक्तिगत लक्ष घालण्याचे आश्वासन
- २०१७ : मराठीला अभिजात भाषेचा दर्जा देण्याची शिफारस
- २०१८ : मागणीकडे पंतप्रधानांचे लक्ष वेधण्यासाठी ‘मसाप’चे दिल्लीत आंदोलन
- २०२४ : मराठीसह पाली, प्राकृत, आसामी, बंगाली या भाषांना अभिजात भाषेचा दर्जा



‘मराठी’ला अभिजात भाषेचा दर्जा देण्यात आला, हे ऐकून आनंद झाला. हा दर्जा आधीच प्राप्त होणे, अपेक्षित होते. सर्वप्रथम तमिळ भाषेला अभिजात भाषेचा दर्जा प्रदान करण्यात आला. ‘मराठी’ भाषेचे वैभव मराठी माणसाने पुढे नेले पाहिजे. मराठी भाषेचा इतिहास हा ‘पाणिनी’पासूनचा, इतका जुना आहे. परंतु ही गोष्ट कुठेच शिकवली जात नाही. तमिळ भाषेप्रमाणे मराठी भाषा ही फार पूर्वीपासूनच आहे.
— भालचंद्र नेमाडे, ज्येष्ठ साहित्यिक, ज्ञानपीठ पुरस्कार विजेते

■■

मराठी भाषेसाठी हा महत्त्वाचा दिवस आहे. दोन हजार वर्षांपूर्वीच्या ग्रंथात असलेले मराठीचे उल्लेख ग्राह्य धरले गेले आहेत. मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्याने मराठी भाषकडे पाहण्याच्या दृष्टिकोन बदलू शकेल. केंद्र सरकारच्या अनुदानामुळे अधिक मोठ्या प्रमाणात भाषा विकासाचे काम करता येईल.
– डॉ. अविनाश आवलगावकर
कुलगुरू, मराठी भाषा विद्यापीठ

■■

स्वार्थी हेतू ठेवून केंद्र सरकारने हा निर्णय घेतला असला, तरी मोदी सरकारचे अभिनंदन करायला हवे. आता राजकीय नेत्यांनी अभिजात शिव्या बंद करून सभ्यतेची भाषा वापरायला हवी. अभिजात भाषेसाठी मिळणाऱ्या निधीचा योग्य वापर करायला हवा.
– डॉ. श्रीपाल सबनीस
अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष

■■

अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळ आणि महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या वतीने पाच लाख पोस्टकार्ड्स पंतप्रधानांना पाठवण्याची मोहीम हाती घेतल्यापासून अभिजात भाषेचा दर्जा देण्याच्या चळवळीला वेग आला होता. महाराष्ट्रात होऊ घातलेल्या विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता लागण्यापूर्वी केंद्राने दहा वर्षे रोखून धरलेला हा दर्जा जाहीर केला, ही अतिशय आनंदाची बाब आहे.
– डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी
माजी अध्यक्ष, अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळ

■■

मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा, यासाठीच्या सर्व बाबींची पूर्तता प्रा. रंगनाथ पठारे यांच्या अध्यक्षतेखालील समितीने केल्यानंतर सरकार दरबारी हालचाली होण्यासाठी महराष्ट्र साहित्य परिषदेने लोकचळवळ सुरू केली. केंद्र सरकारने मराठीला अभिजात भाषेचा दर्जा द्यावा, याकडे पंतप्रधानांचे लक्ष वेधण्यासाठी २०१८ च्या जानेवारीमध्ये दिल्लीत जाऊन परिषदेने धरणे आंदोलनही केले. महाराष्ट्रातील साहित्य संस्थेने दिल्लीत जाऊन आंदोलन करण्याची ही घटनाच ऐतिहासिक होती. त्या सर्वांचे सार्थक झाले.
– प्रा. मिलिंद जोशी
कार्याध्यक्ष, महाराष्ट्र साहित्य परिषद

हिंदू जगातील महामूर्ख जमात - संभाजी भिडे

लोकसत्ता प्रतिनिधी

सांगली : हिंदूंना शत्रू कोण आणि मित्र कोण हे कळत नाही. जगातील महामूर्ख जमात म्हणजे हिंदू. गणेशोत्सव, नवरात्रोत्सव हे आता ‘इव्हेंट’ झाले असून ते हिंदू समाजाला नामर्द बनवत आहेत, असे मत ‘शिवप्रतिष्ठान युवा’चे संस्थापक संभाजी भिडे यांनी गुरुवारी येथे बोलताना व्यक्त केले.

नवरात्रोत्सवानिमित्त सांगली शहरासह विविध ठिकाणी शिवप्रतिष्ठानच्यावतीने दुर्गा दौड काढण्यात येते. आज सकाळी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यापासून दुर्गा दौडीला प्रेरणामंत्र म्हणून प्रारंभ करण्यात आला. सर्वांत पुढे भगवा ध्वजधारी युवक तर त्या मागे अनवाणी हजारो धारकरी सहभागी झाले होते. दुर्गामाता मंदिरात आरती झाली. या वेळी भिडे यांनी उपस्थितांना संबोधित केले.

भिडे म्हणाले, की शिवाजी महाराजांनी हिंदू समाजाला जगाचे नेतृत्व करण्याचा मार्ग शिकवला. पण सध्या हा धर्म निद्रिस्त झाला आहे. हिंदू-मुस्लिम भाई भाई, हिंदूंना शत्रू कोण, मित्र कोण; वाईट कोण, चांगलं कोण हे कळत नाही. यातून बाहेर पडायचे असेल तर शिवाजी महाराजांच्या विचारांचा भारत करण्यासाठी आपल्याला प्रयत्न केले पाहिजेत.

भवानी ज्योत नेताना अपघात, दोघांचा मृत्यू

लोकसत्ता प्रतिनिधी

सोलापूर : तुळजाभवानी मंदिरातून भवानी ज्योत प्रज्वलित करून गावी नेताना पिकअप वाहन रस्त्याच्या कडेला खड्ड्यात कोसळल्याने घडलेल्या अपघातात दोघा तरुणांचा मृत्यू झाला व सहाजण जखमी झाले. सोलापूर मंगळवेढा रस्त्यावर कामती (ता. मोहोळ) गावच्या हद्दीत सकाळी साडेसहाच्या सुमारास ही दुर्घटना घडली. प्रदीप क्षीरसागर (२८) आणि नेताजी कराळे (३०) यांचा मृत्यू झाला असून रोहित चव्हाण (१२), महेश बंडगर (१७), सोहेल मुलाणी (२५), वैभव हजारे (२४), समाधान माशाळ (३०) आणि रोहित कसबे (२०) अशी जखमींची नावे आहेत. हे सर्वजण मंगळवेढा तालुक्यातील गोणेवाडीचे रहिवासी आहेत.

राज्यात ‘ऑक्टोबर हीट’

अलिबागमध्ये सर्वाधिक ३८.९ अंश सेल्सिअसची नोंद

लोकसत्ता प्रतिनिधी

पुणे : पावसाळा संपून मोसमी पावसाचा जोर कमी होताच राज्यात ‘ऑक्टोबर हीट’ जाणवू लागली आहे. शुक्रवारी विदर्भात पारा ३५ अंश सेल्सिअसवर, तर मराठवाडा, मध्य महाराष्ट्रात ३३ ते ३४ आणि किनारपट्टीवर पारा ३३ अंश सेल्सिअसवर गेला आहे. गुरुवारी अलिबागमध्ये सर्वाधिक ३८.९ अंश सेल्सिअसची नोंद झाली आहे.

हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, गुरुवारी (३ ऑक्टोबर) अलिबाग येथे सर्वाधिक ३८.९ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली आहे. सांताक्रुज, कुलाबा, हर्णे आणि डहाणूत पारा सरासरी ३३ अंशांवर होता. मध्य महाराष्ट्रात जळगावात ३४.२ अंश सेल्सिअस तापमान होते. मालेगाव, सोलापूरमध्ये पारा ३३ अंशांवर होता. मराठवाड्यात परभणीत ३४.४ तर अन्यत्र सरासरी ३३ अंशांवर पारा होता. विदर्भातील बहुतेक जिल्ह्यांत पारा ३५ शी पार गेला आहे. अकोला ३५.८, चंद्रपूर ३६.०, गडचिरोली ३५.०, नागपूर ३५.६, वर्धा ३५.० आणि अन्य जिल्ह्यांत पारा सरासरी ३४ अंशांवर होता.

पावसाचा जोर कमी झाल्यामुळे आकाश अनेक ठिकाणी निरभ्र झाले आहे. सकाळपासूनच उन्हाचा चटका जाणवत आहे. दुपारी बारा - एक वाजण्याच्या दरम्यान असह्य उकाड्याचा सामना करावा लागत आहे. सहा ते दहा ऑक्टोबरदरम्यान राज्यात पुन्हा सर्वदूर पावसाच्या हलक्या सरींचा अंदाज आहे. त्यामुळे पुढील तीन - चार दिवसांत पुन्हा पारा खाली येण्याचा अंदाज आहे. साधारण १५ ऑक्टोबरनंतर ऑक्टोबर हीटचा उकाडा वाढण्याचा अंदाज आहे.

तुरळक ठिकाणी हलक्या पावसाचा अंदाज

राज्यात पुढील चार दिवस तुरळक ठिकाणी हलक्या पावसाचा अंदाज आहे. शुक्रवारी (४ ऑक्टोबर) उत्तर महाराष्ट्र आणि पूर्व मराठवाड्यात. शनिवार, रविवार आणि सोमवारी राज्याच्या बहुतेक भागांत दिवसभर उन्हाचा चटका वाढून सायंकाळी मेघगर्जना, विजांच्या कडकडाटासह हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाचा अंदाज आहे.

> साधारण सहा ऑक्टोबरपासून पुढील चार - पाच दिवस राज्यात सर्वदूर हलक्या पावसाचा अंदाज आहे. त्यामुळे पुन्हा पारा खाली येण्याची शक्यता आहे. १५ ऑक्टोबरनंतर ऑक्टोबर हीटचा उकाडा जास्त जाणवू शकतो.
> - डॉ. एस. डी. सानप, शास्त्रज्ञ हवामान विभाग

pnb Housing Finance Limited Ghar Ki Baat

परिशिष्ट - IV-अ - अचल मालमत्तेची ई-लिलाव विक्री सूचना

सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) रुल्स, 2002 मधील नियम 8(6) च्या तरतुदींसह वाचण्यात येणाऱ्या सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शीअल ॲसेट्स अँड एनफोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, 2002 अंतर्गत अचल मत्तांच्या विक्रीसाठी ई-लिलाव विक्री सूचना.

नोंदणीकृत कार्यालय:- 9 वा मजला, अंतरीक्ष भवन, 22 कस्तुरबा गांधी मार्ग, नवी दिल्ली- 110001, फोन:- 011-23357171, 23357172, 23705414, वेब.: www.pnbhousing.com

वाराजे शाखा : 12, स्पंदन, सर्व्हे क्र. 117/1, पॉप्युलर नगर, वाराजे, पुणे, महाराष्ट्र - 411052. **खराडी शाखा :** तिसरा मजला, गणलक्ष्मी कॉम्प्लेक्स, सर्व्हे क्र. 08, हडपसर खराडी बायपास रोड, खराडी, पुणे, महाराष्ट्र - 411014

याद्वारे खाली स्तंभ क्र. - ए मध्ये नमूद कर्जदार व जामीनदारांना आणि सर्व लोकांना सूचित करण्यात येते की सुरक्षित धनकोकडे तारण / भाग्रस्त असलेल्या खाली स्तंभ - डी मध्ये नमूद अचल मालमत्तेचा मे. पीएनबी हाऊसिंग फायनान्स लिमिटेड / सुरक्षित धनको च्या प्राधिकृत अधिकाऱ्यांनी रचनात्मक / प्रत्यक्ष ताबा घेतलेला असून (स्तंभ - सी मध्ये नमूद केल्यानुसार) त्यांची **''जशी आहे जेथे आहे'' आणि ''जशी आहे जे काही आहे'' आणि ''तेथे जे काही आहे''** तत्त्वावर खाली नमूद तपशिलानुसार विक्री करण्यात येईल. याद्वारे ही सूचना सद्य दिनांकास सुधारित सिक्युरिटी इंटरेस्ट एनफोर्समेंट रुल्स, 2002 मधील नियम- 8(6) व 9 अंतर्गत स्तंभ क्र. ए मध्ये नमूद करण्यात आलेल्या कर्जदार / गहाणदार / कायदेशीर वारस, कायदेशीर प्रतिनिधी (ज्ञात किंवा अज्ञात), संबंधित कर्जदार / गहाणदारांच्या (मयत झाले असल्यास) मृत्युपत्रव्यवस्थापक, प्रशासक, वारसदार, अभिहस्तांकिती यांना देऊ करण्यात येत आहे. विक्रीच्या अटी व शर्तींच्या तपशीलासाठी कृपया मे. पीएनबी हाऊसिंग फायनान्स लिमिटेड / सुरक्षित धनकोच्या वेबसाईटला www.pnbhousing.com येथे भेट द्यावी.

कर्ज क्र., कर्जदार/ सह-कर्जदार/जामीनदार/ कायदेशीर वारसाचे नाव (ए)	मागणी केलेली रक्कम व दिनांक (बी)	ताबा स्वरूप (सी)	तारण मालमत्तेचे वर्णन (डी)	आरक्षित किंमत (आ. कि.) (ई)	बयाणा रक्कम (आ. कि. च्या 10%) (एफ)	बोली सादर करण्याचा शेवटचा दिनांक (जी)	बोली वृद्धी दर (एच)	पाहणीचा दिनांक व वेळ (आय)	लिलावाचा दिनांक व वेळ (जे)	असल्यास, ज्ञात बोजे/न्यायालयीन खटले (के)
HOU/WRJE/1018/595195, शाखा : वारजे, विकाल अनिल रणवरे / प्रज्वाला साहेबराव भालेराव	रु. 3455604.32 दि. 17-12-2021 रोजी नुसार	प्रत्यक्ष ताबा	बिल्डिंग ए, 3रा मजला, 306.0, कलश, गट क्र. 449, 604 आणि 605 कासार, आंबोली पिरंगुट लवासा रोड पुणे, पुणे, महाराष्ट्र - 412115, भारत. (कार्पेट 535 चौ. फू. अंदाजे)	रु. 2086000	रु. 208600	18.10.2024	रु. 10,000	10.10.2024 रोजी दुपारी 12:00 ते दुपारी 04:00 दरम्यान	19.10.2024 रोजी दुपारी 01:30 ते दुपारी 03:00 दरम्यान	ज्ञात नाही
HOU/WRJE/0317/366442, शाखा : वारजे, दीपक अण्णासो पाटील / सुप्रिया दिपक पाटील	रु. 1510704.75 दि. 17-10-2019 रोजी नुसार	प्रत्यक्ष ताबा	बिल्डिंग बी1, चौथा मजला, 403, नक्षत्र, गट क्र. - 450/12, कासार आंबोली, गुडेल कंपनी समोर, पिरंगुट, पुणे, महाराष्ट्र - 412115, भारत. (बिल्ट अप 686 चौ. फू. अंदाजे)	रु. 1418000	रु. 141800	18.10.2024	रु. 10,000	09.10.2024 रोजी दुपारी 12:00 ते दुपारी 04:00 दरम्यान	19.10.2024 रोजी दुपारी 01:30 ते दुपारी 03:00 दरम्यान	ज्ञात नाही
NHL/KRDI/0220/774434, शाखा : खराडी, राज काशीराम मंडळे / चांदणी पोचू मोहुर्ले / एरनेस्ट टेक्नोवेअर प्रायव्हेट लिमिटेड	रु. 3167473.12 दि. 14-06-2023 रोजी नुसार	प्रत्यक्ष ताबा	बिल्डिंग ए, 4था मजला, कार्यालय क्र. 401, ऑक्सी प्राईमो, गट क्र. - 559/1 वाघोली, ता. हवेली, जिल्हा, पुणे, पुणे, महाराष्ट्र - 412207, भारत. (कार्पेट 334 चौ. फू. अंदाजे)	रु. 2740000	रु. 274000	18.10.2024	रु. 10,000	08.10.2024 रोजी दुपारी 12:00 ते दुपारी 04:00 दरम्यान	19.10.2024 रोजी दुपारी 01:30 ते दुपारी 03:00 दरम्यान	ज्ञात नाही

*सोबत भरण्याच्या व / वा वसुलीच्या दिनांकापर्यंतचे लागू असेल त्यानुसार वार्षिक 18% दराने पुढील व्याज, आनुषंगिक खर्च, शुल्के, अधिभार इ. **पीएनबी हाऊसिंग फायनान्स लिमिटेड च्या प्राधिकृत अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार वर स्तंभ - के मध्ये जाहीर केलेल्या माहितीशिवाय वर नमूद अचल / अनामत मत्तांच्या संदर्भात इतर कोणतेही बोजे / दावे नाहीत. याशिवाय असे कुठलेही बोजे असल्यास यशस्वी खरेदीदाराने / बोलीदाराने ते स्वतः भरावयाचे आहेत. संभाव्य खरेदीदार / बोलीदारांना विनंती आहे की त्यांनी वर नमूद बोज्यांची स्वतंत्रपणे चौकशी करावी. (1) आज दिनांकास वर नमूद अचल मालमत्ता / अनामत मत्तांची विक्री करणे, त्यांची विल्हेवाट लावणे इ. पासून पीएनबीएचएफएल / पीएनबीएचएफएल च्या प्राधिकृत अधिकाऱ्यांना प्रतिबंध करणारा कोर्टाचा कोणताही हुकुम नाही आणि स्थितीचा उल्लेख स्तंभ क्रमांक- के मध्ये केला आहे. (2) संभाव्य खरेदीदारांनी / बोलीदारांनी आणि इच्छुकांनी स्तंभ - के मध्ये नमूद केलेल्या प्रक्रिया / आदेश इ. मधील बाजूची स्वतंत्रपणे चौकशी करावी. यात पीएनबीएचएफएल यांचेकडे उपलब्ध असलेल्या दस्तावेजांच्या मालकी हक्काचा समावेश आहे, परंतु ते तेथेपर्यंतचे मर्यादित नसून त्यांनी निविदा / बोली अर्ज सादर करण्याअगोदर किंवा प्रस्ताव देण्याअगोदर सर्व बाबतीत चौकशी करून घ्यावी. बोलीदाराने या लिलावाच्या अटी व शर्तीवर बोली फॉर्मसह स्वाक्षरी करणे आवश्यक आहे. (3) कृपया लक्षात घ्यावे की सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) रुल्स, 2002 मधील नियम 9(3) च्या अनुषंगाने बोलीदार / खरेदीदार विक्री किमतीच्या 25% एवढी रक्कम (जमा केलेली बयाणा रक्कम धरून) त्याच दिवशी किंवा फार तर पुढील कामकाजाच्या दिवशी सादर करण्यास बांधील आहे. सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) रुल्स, 2002 मधील नियम 9(2) नुसार सुरक्षित धनकोस विक्री किमतीच्या 25% एवढी रक्कम प्राप्त झाल्यावरच विक्री बोलीदाराच्या नावे निश्चित करण्यात येईल. विक्री रकमेपैकी उर्वरित 75% रक्कम खरेदीदारास विक्रीच्या निश्चितीच्या पावतीच्या दिनांकापासून 15 दिवसांचे आत जमा करावी लागेल अन्यथा अशा ठेवी चुकवल्यास, प्राधिकृत अधिकारी विक्रीच्या पुष्टीकरण पत्रात नमूद केलेल्या 15 दिवसांच्या अनिवार्य कालावधीच्या समाप्तीच्या तारखेपासून 15 दिवसांच्या आत विक्रीच्या मोबदल्याच्या रकमेचे काही भाग जप्त करेल आणि मालमत्ता / अनामत मत्तेची पुनर्विक्री करण्यात येईल. (4) सी1 इंडिया प्रायव्हेट लिमिटेड हे प्राधिकृत अधिकाऱ्यांना ई-लिलावाच्या माध्यमातून विक्रीची प्रक्रिया राबविण्यास मदत करतील. ज्याचे कॉर्पोरेट कार्यालय प्लॉट क्रमांक 68, तिसरा मजला, सेक्टर 44, गुडगाव, हरियाणा 122003 वेबसाइट - www.bankeauctions.com मालमत्तेची तपासणी किंवा बोली दस्तऐवज मिळविण्याशी संबंधित कोणत्याही सहाय्यासाठी आणि इतर कोणत्याही प्रश्नासाठी किंवा नोंदणीसाठी, **पीएनबीएचएफएल चे प्राधिकृत व्यक्ती पंकज तिवारी / अमोल माने, संपर्क क्र. : 1800 120 8800, यांचेशी संपर्क साधावा किंवा www.pnbhousing.com येथे भेट द्यावी.**

स्थान : पुणे, दिनांक : 04.10.2024 **स्वा/- प्राधिकृत अधिकारी, पीएनबी हाऊसिंग फायनान्स लिमिटेड**

उप आयुक्त
घनकचरा व्यवस्थापन कार्यालय
पुणे महानगरपालिका
निविदा प्रक्रिया कक्ष
निविदा जाहिरात - नविन कामे

पुणे Pune अद्वितीय & Unique

विक्री कालावधी दिनांक:- ०४/१०/२०२४ ते दिनांक १४/१०/२०२४
निविदा स्वीकृती दिनांक :- ०४/१०/२०२४ ते दिनांक १४/१०/२०२४ **तांत्रिक निविदा उघडणे दिनांक:-** १५/१०/२०२४

अ. क्र.	निविदा क्र.	कामाचे नाव	निविदा संच किंमत रु.	अंदाजित पूर्वगणित र. रु. (जी.एस.टी. वगळता)	बयाणा र रु.	कामाची मुदत	निविदा विषयक जबाबदार व्यक्तीचे नाव व मोबाईल क्र.
1	PMC/SWM/ 2024-25/38	घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत खराडी येथे नवीन कचरा रॅम्पसाठी शेड उभारणे	1359/-	58,75,544/-	59,000/-	06 महिने	श्री. प्रदीप नाणेकर 8552062426
2	PMC/SWM/ 2024-25/39	झोन क्र. 1 मधील उभारण्यात आलेले विविध बायोगॅस प्रक्रिया प्रकल्पाची स्थापत्य विषयक देखभाल दुरुस्तीचे काम करणे	1359/-	39,81,635/-	40,000/-	06 महिने	श्री. प्रदीप नाणेकर 8552062426

१) सदर कामांबाबत निविदा अटी शर्ती इ. बाबतचा सर्व तपशिल निविदा संचामध्ये नमूद केला असून सदर कामांचे निविदा संच ***www.mahatenders.gov.in*** या वेबसाईटवर पाहण्यासाठी उपलब्ध आहेत. निविदा संचाची विक्री व स्विकृती सदर वेबसाईटवरून फक्त ऑनलाईन पद्धतीने करण्यात येत असून सर्व निविदा दोन पाकीट पद्धतीने मागविण्यात येत आहेत.
२) ऑनलाईन निविदा प्रक्रिये बाबतची संपूर्ण माहिती/ प्रशिक्षण टेंडर सेल विभाग, पुणे महानगरपालिका येथे मिळेल.

जाहिरात क्र. २/८१९
दि. ०३/१०/२०२४

सही/- उप आयुक्त
घनकचरा व्यवस्थापन,
पुणे महानगरपालिका

शिंदेला लागलेली गोळी कशी सापडली नाही?

उच्च न्यायालयाचा पोलिसांना प्रश्न

लोकसत्ता प्रतिनिधी

मुंबई : बदलापूर येथील लैंगिक अत्याचार प्रकरणातील आरोपी अक्षय शिंदे याला चकमकीदरम्यान लागलेली गोळी सापडत नसल्याच्या राज्य गुन्हे अन्वेषण विभागाच्या (सीआयडी) दाव्याबाबत उच्च न्यायालयाने गुरूवारी नाराजी व्यक्त केली. तसेच शिंदे याच्या मृत्यूची लवकर चौकशी करा आणि त्याचा अहवाल १८ नोव्हेंबरपर्यंत सादर करा, असे आदेश न्यायालयाने महानगरदंडाधिकाऱ्याने दिले.

तसेच, ही गोळी शोधली का नाही, पोलिसांवर गोळीबार करण्यापूर्वी तहान लागली म्हणून शिंदेला दिलेली पिण्याच्या पाण्याची बाटली जप्त का केली नाही, पोलीस अधिकाऱ्याला झालेल्या जखमेची न्यायवैद्यक चाचणी केली का, अशी प्रश्नांची सरबत्ती करून न्यायालयाने सीआयडीच्या तपासावर प्रश्न उपस्थित केला. त्याचवेळी महत्त्वाचे पुरावे गोळा करण्याबाबत पोलिसांकडून केल्या जाणाऱ्या निष्काळजीपणाविषयीही नाराजी व्यक्त केली. तसेच शिंदे याने केलेल्या गोळीबारात जखमी झालेल्या पोलीस अधिकाऱ्याच्या जखमेचा वैद्यकीय अहवालही न्यायालयात सादर करण्याचे आदेश न्यायालयाने सीआयडीला दिले.

शिंदे याला अन्य प्रकरणाच्या तपासाच्या निमित्ताने घेऊन जात असताना त्याने पाणी म